# प्रेसनोट

## लाखो रुपयांचा गंडा घालून ५ वर्षा पासून फरार असलेल्या आरोपीस गुन्हे शाखा युनिट -३ ने क़ेले जेरबंद

---

ओमेगा आय ट्रेड इंडस्ट्रीज या नावाने फर्ग्युसन कॉलेज रोडवर प्रोप्रायटरशिप फर्मव्दारे जमीनीत पैसे गुंतविण्याचे अमिष दाखवून त्यांचेकडे गुंतविलेल्या रक्कमेच्या बदल्यात २१० दिवसात पैसे डब्बल करुन मिळतील असे सांगून लोकांना पैसे गुंतविण्याची भुरळ पाडून लोकांकडून बेकायदेशिर पणे लाखो रुपये घेऊन लोकांना ते परत न करता त्यांची फसवणूक करणारा भामटा **वसंत गोविंद भालवणकर** रा. फर्ग्युसन कॉलेज रोड शि.नगर पुणे याचे विरुध्द सन २०१४ मध्ये डेक्कन पोलीस स्टेशन गु.र.नं.११/२०१४ भा.दं.वि.कलम ४०६,४२०,५०४,५०६,३४ आर्म ॲक्ट कलम ४(२५) प्रमाणे फसवणूकीचा व विश्वासघाताचा गुन्हा दाखल झाला होता. तेंव्हा पासून तो आपले अस्तित्व लपवून पुणे शहरात तसेच इतरत्र वावरत होता.

गुन्हे शाखा युनिट ३, पुणे शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. राजेंद्र मोकाशी, यांचे मार्गदर्शना खाली गुन्हे शाखा युनिट ३ कडील अधिकारी वं कर्मचारी यांचे पथक हे पाहिजे / फरारी आरोपींचा शोध घेत असताना पोलीस उपनिरीक्षक किरण अडागळे यांना त्यांचे खब-या मार्फत बातमी मिळाली की, अलंकार पोलीस स्टेशन कडील पाहिजे आरोपी नामे वसंत भालवणकर हा महाबळेश्वर हॉटेल बाणेर पुणे या ठिकाणी हॉटेलचे जवळ रोडवर उभा आहे. अशी खात्रीशिर माहिती मिळाल्यांने वरिष्ठांचे मार्गदर्शना खाली सदर ठिकाणी जाऊन सापळा रचून बातमीतील नमूद आरोपी वसंत गोविंद भालवणकर वय ५३ वर्षे मुळ रा.११९७/२ फर्ग्युसन कॉलेज रोड शिवाजीनगर पुणे यास शिताफिने पकडून त्याचेकडे तपास करता त्याचे विरुध्द डेक्कन पोलीस स्टेशन येथे सन २०१४ मध्ये फसवणूकीचा व विश्वासघाताचा गुन्हा दाखल असून सदर गुन्हा घडले पासून तो आपले मित्रांकडे व इतर नातेवाईकां कडे रहात होता.

तसेच त्याचेकडे पैसे मागावयास आलेल्या लोकांना धमकावून, मारहाण करुन दुखापत केल्याने त्याचे विरुध्द अलंकार पोलीस स्टेशन पुणे येथे गु.र.नं.५३/२०१६ भा.दं.वि.कलम ३२४, ३४ दुखापतीचा गुन्हा दाखल असून त्या गुन्हयातही तो फरार आहे. तसेच त्याचे विरुध्द शिवाजीनगर न्यायालयात चेक बाऊन्सचे १० ते १५ केसेस प्रलंबीत असल्याचे समजले आहे. त्यास पुढील कार्यवाही करीता अलंकार पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे श्री. अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त श्री.शिरीष सरदेशपांडें, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा -१ श्री.समीर शेख, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोकाशी, पोलीस उप निरीक्षक किरण अडागळे, पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड,सहा.पोलीस फौजदार दत्तात्रय गरुड,किशोर शिंदे,दिपक मते,पो.हवा.मेहबुब मोकाशी, मच्छिंद्र वाळके, रोहिदास लवांडे, रामदास गोणते,पो.ना.संदीप राठोड यांचे पथकाने केली आहे.